अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# ...तो आला आणि प्रत्येकजण मनापासून सुखावला

अखेर तो आला....! बऱ्याच प्रतीक्षेनंतर तो आला आणि आल्यानंतर किती दिवस थांबेल, कसा थांबेल! थांबेल की नाही, की आल्या आल्या हुलकावणी देऊन पुन्हा येतो असे सांगून भुर्रकन् निघून जाईल असेही वाटले होते. पण तसे झालेले नाही तो आला उशिरा आणि हवा तसाच थांबलाही. गेल्या आठवडाभर मुंबईकरांना त्याचा मनसोक्त सहवास मिळतो आहे. त्याच्याबरोबर होणाऱ्या त्रेधातिरपीटीतही मुंबईकर तितक्याच मनमुरादपणे सुखावतोही आहे. मुंबईबरोबरच राज्याच्या अनेक भागातही त्याने आपली हजेरी लावली. ती लावताना फारशी तक्रारीला जागा राहणार नाही, अशीदेखील तो काळजी घेताना दिसतो. अर्थातच आता येणेच उशिरा झाल्यामुळे आपल्याला नेहमीसारखा मुक्काम करता येणार नाही याचीही कल्पना द्यायला तो विसरलेला नाही. अगदी परवापरवापर्यंत सगळ्यांचीच छाती दडपली होती.

दरवर्षी ठरल्यावेळी येणारा आणि शक्य तेवढी समाधानकारक कामगिरी करणारा हा येतो की नाही अशी भीती वाटत होती. काही का असेना आणि काही प्रमाणात का होईना त्याने आपला शब्द पाळला. उशीर करूनही तो आला आणि अक्षरश: प्रत्येकजण मनापासून सुखावला. एवढा वेळ ज्याचा तो तो एकेरी उल्लेख केला जातो, कारण तो आहेच तितका जवळचा. येतो वर्षातून एकदाच पण जणू काही सगळ्या आयुष्याचाच वाटत असतो. जीवन सखा हे कोणीही नाकारू शकत नाही, की तो येतो म्हणूनच जीवनाचे गाडे सुरळीत चालू राहते. तो जर आलाच नाही अशा नुसत्या कल्पनेनेच थरकाप होतो. इतका तो सगळयांचाच जीवलग आहे. कदाचित हे नाते तोदेखील विसरू शकत नाही. मनामनाला आनंदी करणारा ऋणानुबंध तोदेखील नाकारू शकत नाही. अशा या ऋणानुबंधाचा हा ऋतुराज आला आहे आणि आपल्याला ऋणी करत असतो. यावरून सृष्टीशी किंवा निसर्गाशी माणसाचे कसे अनामिक परंतु घट्ट नाते आहे हे सिध्द होते. अर्थात मनुष्यसुध्दा या सगळ्या विशाल अशा निसर्गाचाच एक भाग असतो. मात्र मनुष्य सृष्टीविषयी वाटणाऱ्या भावना वेगवेगळ्या माध्यमातून व्यक्त करीत असतो. तीनही प्रमुख ऋतूंमध्ये सर्वाधिक सुखावह वाटणारा ऋतू म्हणून वर्षाऋतूचे महत्त्व मान्य करावे लागते. तीनही ऋतू एकमेकांशी घनिष्ट संबंधित असले तरी जर वर्षाऋतू नसेल तर एकूणच सृष्टीची किंवा मनुष्याची काय अवस्था होईल याची सहज कल्पना येते.

## मनाच्या व्यापकपणाचे निमित्त

तो-तो-हा-हा म्हणजे तो तुमच्या आमच्या मनातला पाऊस प्रत्येकाच्या मनात येऊन जणू पिंगा घालतो आहे. तो आला आणि प्रत्येकाने समाधानाचा नि:श्वास सोडला. पावसाबरोबरचे हे नाते कोणत्याही नेमक्या शब्दात सांगता येत नाही. किंबहुना ते व्यक्तही करता येत नाही. हे असे काही नाते आहे ते फक्त अनुभवल्याशिवाय लक्षात येत नाही. बऱ्याचवेळेला आपल्या मदतीला येणारे ते नातेवाईक असे आपण म्हणतो किंवा ज्याच्याजवळ आपल्या मनातल्या गुजगोष्टी सांगाव्यात ज्याच्या सहवासामुळे मनाचा भार हलका व्हावा, ताण नाहीसा व्हावा अशी आपलेपणाची संवेदना निर्माण होते तिथेच नातेही जुळून येते. पावसाबरोबरची ही संवेदना केवळ अनुभवण्याचा विषय आहे. या पावसाला अनेकांनी अनेक प्रकारची उपमा दिलेली आहे. कोणाला तो प्राणसखा वाटतो, कोणाला तो मनकवडा वाटतो, तर कोणाला आपला सखासोबती वाटतो. पावसाचे येणे म्हणजे अवघ्या सृष्टीवर सृजनतेची पखरण करणे असते.

पावसाचे येणे म्हणजेच खूप दिवसाचे साठून राहिलेले देणे आणि घेणे असते. पाऊस आल्यानंतर दऱ्या डोंगरातून, कड्या-कपारीतून धावत येणारे ओढे नाले आणि तितक्याच आनंदाने उंचावरून उडया घेणारे धबधबे याच पावसाच्या संगीतातून निर्माण झालेले सृष्टीचे स्वत:चे जीवनगाणे असते. या काळात मनुष्यदेखील वर्षासहलीला जाण्याचा आपला मोह आवरू शकत नाही. त्याच सृष्टीच्या सहवासात जावून पावसाचे पाऊसपण आणि माणसाचे माणूसपण जोखण्याचा तो प्रयत्न असतो. एकूणच सगळ्या जीवनप्रवासामध्ये एका ठरावीक चाकोरीत वावरणाऱ्या माणसाला या सृष्टीमध्ये किंवा निसर्गामध्ये खूप काही व्यापक आणि उदात्त आहे याची जाणीव असते. मात्र त्याचा अनुभव घेता येत नाही.ज्यावेळेला तो निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन काही गोष्टी पाहतो, त्यावेळेला निसर्गाची विशालतासुध्दा आपले मन मोठे करू शकते. म्हणजेच मनाला संकुचितपणाच्या चाकोरीतून बाहेर काढू शकते. याची तीव्र जाणीव मनुष्याला यानिमित्ताने होत राहते.

## सृष्टीचक्राचे रहस्य

सृष्टीची काय किमया आहे. केवळ एका ऋतूमुळे आनंदाची बहार निर्माण व्हावी. केवळ या एका पावसामुळे सुकलेला कोमेजलेला निसर्ग हिरवाईच्या शालूने उल्हासित होतो. खरे तर नवा आत्मविश्वास तो व्यक्त करतो. शेता शेतातून डवरून येणारे पीक पाणी सृष्टीच्या सौजन्याचा सर्वात मोठा अविष्कार असतो. यासाठीच तर ना.धो.महानोर यांच्यासारखा कवी जोंधळ्याला मोती लगडल्याची उपमा देतो. बालकवीसारखा कवी तर पावसाची ही लीला पाहून क्षणात येणाऱ्या श्रावणातल्या सरी मनातला हर्ष जागवतात, असे सहजपणे म्हणून जातो. आषाढातला गडगडणारा आणि काळोकभिन्न वाटणारा मेघांचा धुम्र्कूळ जणूकाही त्या प्रेमाचे आणि सौजन्याचे आक्रमण करीत आहे, असे अनेक कवींना वाटत राहते.

सृष्टीच्या या विविधतेपुढे कोणत्याही संवेदनशील व्यक्तीच्या भावना मोकळया झाल्याशिवाय राहात नाहीत. कारण मनाच्या कोपऱ्यामध्ये वेगवेगळया कारणांमुळे तरुण असलेल्या उदासपणाला हा पाऊस काही काळासाठी का होईना पण नाहिसा करतो आणि मिळालेले आयुष्य हे स्वत:बरोबर इतरांनाही देण्यासाठी आहे, असाच संस्कार याच पावसाकडून घेतो. कारण न चुकता थोडा मागे पुढे होताहोता तो येतो आणि आयुष्याचे आनंदाचे आश्वासन देऊन जातो. निसर्गाकडून मिळणारे हे संचित अमूल्यच आहे. कारण हजारो वर्षांपासूनच्या सृष्टीच्या अस्तित्वाचे कदाचित पाऊस हे एक फार मोठे निमित्त असले पाहिजे. अव्याहत चालणारे हे सृष्टीचक्र मनुष्याला आशावाद शिकवते. आत्मविश्वासाचे दरवर्षी मिळणारे हे नवे दान अनेक आव्हाने पेलण्याचे बळ देत असते. म्हणूनच पाऊस येणे या साधारण वाटणाऱ्या गोष्टीत तितकेच मोठे रहस्य दडलेले असते.